# ४३. गुढी

मित्रांनो आपल्या सर्वांना गुढीपाडवा हा सण माहितीचा आहे. त्यादिवशी आपण गुढी उभारतो कारण श्रीराम रावणाचा वध करून अयोध्याला येतात व त्यांच्या स्वागतासाठी नगरवासी गुढी उभारतात.

गुढी किती छान दिसते नाही. (उंच काठी, त्यावर स्वच्छ, रंगीत रेशमी कापड, काठीच्या टोकावर तांब्याचा उपडा गडू, हार, साखरेच्या गाठयांची माळ ऐवढया वर्णनावरूनसुद्धा गुढी नजरेसमोर दिसायला हरकत नाही.)

यावर्षी माझ्या एका मित्राने मला गुढी भेट दिली. तुम्ही म्हणाल हा काय प्रकार आहे ? हल्ली गुढया परदेशी निर्यात होतात. हुबेहुब मोठया गुढीची छोटी प्रतिकृति. ती गुढी मी माझ्या ऑफीस टेबलावर ठेवली. तुम्हाला माहितीच आहे की माझ्या ऑफीस टेबलावर कोंबडीचे पिल्लू, बेडूक व बांबूचे झाड यांनी जागा आधीच पटकावली आहे.

मी गुढीकडे बरच वेळ टक लावून बघत होतो. सौ. ला वाटले कि मी ध्यानच करतो आहे. गुढीकडे बघता बघता मनात विचारांच्या लाटा थडकत होत्या. गुढीचे नवीन संदर्भ मनात वावटळी सारखे फिरू लागले. काही मिनीटांनी मी भानावर आलो व लगेच मनातील विचारांचीच जंत्री कागदावर केली व वेळ मिळाल्यानंतर एखादा लेख लिहण्याचे ठरविले.

आज मला मुहूर्त मिळाला. आज संकष्टी चतुर्थी, शनिवार, (५-५-२००७) गावच्या निसर्गाच्या सान्निध्यातला निवांतपणा. असो.

माझ्या मनात प्रथम विचार आला की आपण जरी गुढीपाडव्याला गुढी उभारत असलो तरी तसे आपण नेहमीच विजयाच्या क्षणी, आनंदाच्या क्षणी हात उंचावून बोटांचा **V** आकार करून प्रतिकात्मक गुढी उभारतच असतो. हात उंचावून आनंद साजरा करणे, दुस-याला अभिवादन करणे ही तर जवळजवळ प्रतिक्षीप्त क्रियाच झाली आहे. **V** चा अर्थ **Victory** ( विजय ) च असू दे नाहितर **V** म्हणजे **Violence** होता काम नये. त्यांच्यानंतर गुढीतील प्रत्येक गोष्टींपासून आपण काय शिकले पाहिजे हे मनात आहे. मला विद्यार्थी दशा खूप आवडते व त्यामुळेच प्रत्येक गोष्ट, मग ती निर्जिव असली तरी मी काहीतरी शिकायचा प्रयत्न करत असतो.

गुढीवर आपण स्वच्छ, रंगीत, रेशमी कापड घालतो. आपले मन, शरीर सुद्धा ह्या कापडाप्रमाणे स्वच्छ, निर्मळ राखणे आपले कर्तव्य आहे. मनाचे समाधान, शांती ही नेहमीच शरीरावर प्रतिबिंबीत होते. आपले शरीर मनाच्या ताब्यात व मन बुद्धिच्या ताब्यात आणि बुद्धि आत्मविवेकाच्या ताब्यात असेल तर माणूस ह्या मोहमयी दुनियेत कधीच भरकटणार नाही. परंतु बरेचवेळा शरीर मनाचा ताबा घेते व माणसाचा तोल जातो.

गुढीवर आपण तांब्याचा गडु उलटा ठेवतो. आपण लहानाचे मोठे होतो त्यामध्ये ब-याच लोकांचा हातभार लागलेला असतो. पालक, शिक्षक, नातेवाईक, शेजारी वगैरे बरीच मंडळी आपल्याला एक चांगला नागरिक बनविण्याचा प्रयत्न करतात. आपण शिकतो, नोकरी व्यवसायात प्रगती करतो. परंतु हे समाजाचे ऋण आपण कधीही विसरता कामा नये. आपल्या शिक्षणाचा, संपत्तीचा उपयोग समाजासाठी कसा करता येईल याचा विचार आयुष्याच्या संध्याकाळी मनात आला पाहिजे. आपण काही ही न घेता या पृथ्वीवर जन्म घेतो. आपण मिळविलेले सर्व ज्ञान, पैशाचा विनियोग इथेच करून आपण रिकाम्या हाताने परतीचा प्रवासाला तयार झाले पाहिजे.

गुढीवर आपण हार, फुले घालतो. आपले आयुष्य आपल्या वागणुकीने कसे सुगंधीत होईल हे बघितले पाहिजे. हार, फुले यांचे १ दिवसात निर्माल्य होते. आपले आयुष्य असेच क्षणभंगुर आहे ह्याची जाणीव पदोपदी ठेवली तर माणसाचे पाऊल वाकडे पडणार नाही. दिनक्रम असा आखला पाहिजे की जणू आपले आयुष्य १ दिवसाचेच आहे. सकाळी उठलो म्हणजे जन्म व रात्री झोप म्हणजे मरण, विश्रांती. हा दिवस मी कसा सार्थकी लावीन या एका विचारानेच दिनचर्या पार पाडली पाहिजे.

गुढीवर आपण साखरेच्या गाठयांची माळ घालतो. 'जिभेवर साखर आणि डोक्यावर बर्फ' ठेवण्याची आजच्या धकाधकीच्या अशांत काळात गरज आहे. मनुष्य जन्म हा आपल्याला प्रसाद म्हणून मिळाला आहे व त्यामुळेच प्रसादाचे पाविञ्य आपल्या वर्तणुकीत दिसले पाहिजे.

त्या गुढीची प्रतिकृति धूळ, कचरा यापासून संरक्षण करण्यासाठी एक पॅस्टिकच्या पेटीत ठेवली होती. आपल्या शिक्षणाने, ज्ञानाने, उच्च विचारसरणीने, उत्तम वर्तनशैलीने आपल्याला असेच कवच लाभत असते. ज्याच्यामुळे ह्या मोहमयी अशांत जीवनात आपली नौका भरकटत नाही. पण हे सर्व गुण आपल्याला टिकवावे लागतात. देवावर श्रद्धा असेल तर चांगलेच आहे. पण एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे कि आपल्या हातून जे कार्य घडते ते आपण करत नसतो. एक अज्ञात शक्ती ते आपल्याकडून करून घेत असते. आपण निमित्तमात्र असतो. ज्या दिवशी आपला 'मी' गळून पडेल तो आयुष्यातील भाग्यदिन.

काय मित्रांनो, तुम्हाला सुचतोय का काही वेगळा विचार ?